# कृषिसमृध्दी : समन्वयीत कृषि विकास प्रकल्प

## यशोगाथा

### कापुस पणन व्यवस्थेत शेतकऱ्यांचा वाढता सहभाग






विदर्भामध्ये खरीप हंगामातील कापुस हे मुख्य पीक आहे. अमरावती जिल्हयामधील विशेषत: अचलपूर तालुक्यामध्ये कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जाते, यामध्ये संकरीत वाणांचा वापर केला जातो. प्रामुख्याने अजित १५५ बी जी२ राशीचा कापुस, मल्लिका, डॉ. बेंट इ. जातींचा लागवडीसाठी वापर केला जातो. परंतु यातील काही जातींचे बियाणे कृषिसेवा केंद्रामार्फत बहुतांश वेळा सुमारे रु. ४०० ते ५०० प्रति पाकीटाच्या मुळ किमतीपेक्षा जास्त घेतले जातात, असे शेतकरी सांगतात. याकरीता सर्वात प्रथम कृषिसमृध्दी प्रकल्प व रामकी फाऊंडेशनच्या वतीने अचलपुर तालुक्यातील ४००० शेतकऱ्यापर्यंत जाऊन कोणत्या जातीचे वाण निवडावे याबाबतची चर्चा करण्यात आली. पैकी ६० टक्के शेतकऱ्यांची अजित १५५ बी जी २ या वाणाला पसंती दर्शविली. म्हणुन कृषिसमृध्दी प्रकल्पाच्या वतीने अजित सीडस प्रा.लि. या कंपनीशी संवाद साधला व त्यांच्याकडुन ४०० शेतकऱ्यांकरीता १००० पाकिटे थेट कंपनीकडुन शेतकऱ्याच्या दारापर्यंत पोहोचवण्यात आलेले आहेत. सदर बियाण्याची किंमत कृषिसेवा केंद्रात रु. १४०० नी विकले जात होते, सदर बियाणे थेट कंपनीकडुन शेतकऱ्यांना रु. ९३० मध्येच मिळाले. बियाणे लागवड करावयाच्या अगोदर जैन इरिगेशन मार्फत ड्रीप बसविण्यासंदर्भातील सर्वे करण्यात आला व ४०० पैकी ८० शेतकऱ्यांच्या शेतामध्ये ड्रीप बसविण्यात आले. प्रत्येक गावामध्ये अजित सीडस प्रा. लि. कंपनीतर्फे शेतीशाळा घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन देण्यात आले. कापसाच्या पिकाची पाहणी करण्यासाठी अजित सीडस प्रा.लि. कंपनीचे कृषितज्ज्ञामार्फत दोन वेळेला क्षेत्र भेट देण्यात आली व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. चालु हंगामामध्ये थेट कंपनीकडुन बियाणे मिळाल्यामुळे हमीचे बियाणे उपलब्ध झाले व गतवर्षी पेक्षा तीन ते चार क्विंटल प्रती एकर उत्पादन जास्त मिळाले.

कापुस पिकवल्यानंतर शेतकरी कापुस घरातुनच कापुस व्यापारी/दलाल यांनाच विकतात. दलाल/व्यापारी कापुस विकत घेताना इलेक्ट्रॉनिक काटा न वापरता पन्नी काटयाचा वापर करतो. पन्नी काटा

२० किलो अथवा २५ किलोचा राहतो व पन्नी काटयाने वजन करताना इथेच व्यापारी शेतकऱ्यांची लुट करण्याची शक्यता असते कारण पन्नीचे वजन करताना मापाडी एका पन्नीमागे किमान एक किलो कापूस ज्यादाचा घेतो. म्हणजेच एका क्विंटलमागे किमान चार किलो वजनाचा कापुस दलालाला/व्यापाऱ्याला ज्यादाचा जातो. जर कापसाचा बाजार भाव रु. ५००० प्रतिक्विंटल असेल तर रु. ५० किलोप्रमाणे एकुण रु. २०० प्रतिक्विंटल शेतकऱ्यांची लुट होते.

आज जर आपण पाहिले तर कापुस कोणीही वर्षानुवर्ष साठवुन ठेवत नाही. कोणत्या न कोणत्या कामासाठी अथवा कपडा बनविण्यासाठी त्याचा वापर केला जातो. कापड बनविण्यासाठी कापसाचे सुरुवातीला रुई व सरकी वेगळी करावी लागते व वेगळी केलेली रुई कपडा मिलला दिली जाते, हेच व्यापारी शेतकऱ्याकडील कापूस गोळा करुन जिनिंग व प्रेसींग युनिटमध्ये विकतात. जिनींगमध्ये सदर दलाल/व्यापारी बाजार भावाप्रमाणेच इलेक्ट्रॉनिक काटयाच्या वजनाने विकतात. शेतकऱ्याच्या घरापासुन त्याचे गाडी भाडी, हमाली, मापाई ही बाजारभावाप्रमाणे घेऊन दलाल/व्यापाऱ्याला परवडते तर शेतकऱ्याला का नाही? यानंतर जिनींग व प्रेसींग मिलचे व्यापारी रुई व सरकी वेगवेगळी करुन विकतात. रुई व सरकी विकुनही जिनींग व प्रेसींग करणाऱ्यांना चांगले पैसे मिळतात. जर ही प्रक्रिया आपण शेतकऱ्यांच्या गटामार्फत केली तर? आणि शेतकरी जर उत्पादकापासुन उद्योजक बनला तर काय होईल, हेच करुन दाखवुन दिले आहे, अचलपूर तालुक्यातील सात शेतकरी गटांनी व यांना साथ दिली ती कृषिसमृध्दी प्रकल्प व रामकी फाऊंडेशनने.

अचलपूर तालुक्यामध्ये असलेली विदर्भ मिल म्हणजे आजची फिनले मिल (एनटीसी, भारत सरकार स्थापित) यांचेकडे येणारी रुई बेल स्वरुपात रतलाम, तामिळनाडु, गुजरात व काही प्रमाणात जळगाव जिल्हयातुन येते. विदर्भातील शेतकऱ्याकडुन या मिलला बेल्सचा नगण्य स्वरुपात पुरवठा केला जातो.

कृषिसमृध्दी प्रकल्पाच्या सहाय्याने शेतकऱ्यांसोबत बैठका घेतल्या व या बैठकामध्ये शेतकऱ्यांसमोर प्रकल्पाने आपली कल्पना मांडली, की जिथली मिल तिथलाचं कापुस. बैठकीमध्ये काही ठराविक अडचणी शेतकऱ्यांकडुन मांडण्यात आल्या प्रामुख्याने

- ✓ कापसाचा भाव काय राहील?
- ✓ पैसे किती दिवसात मिळतील?
- ✓ जिनींग व प्रेसींगसाठी लागणारा खर्च कोण करेल?
- ✓ फिनले मिलला त्यांचे नियमावलीनुसार आपल्या कापसाची स्टेपललेन्थ योग्य होईल का?
- ✓ जिनींगमध्ये कापुस ठेवला व त्याला आग लागली तर काय होईल?
- ✓ कापूस जिनींगमध्ये ठेवलेला असताना त्यावर निगराणी कोण ठेवेल?
- ✓ सर्व प्रोसेस केल्यानंतर आम्हाला भाव काय मिळु शकेल?

असे असंख्य प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केले व या सर्व प्रश्नाची उत्तरे त्यांना दिली गेली. सर्व प्रथम त्यांना सांगितले की,

- ✓ जिनींग प्रेसींग मिलचे मालक कापुस विकत घेतात व ते गलई करुन विकतात. जर हे सर्व करुन त्यांना फायदा होत असेल तर शेतकऱ्याला का होणार नाही.

- ✓ कापुस जिनमध्ये आल्यानंतर त्याचे वजन इलेक्ट्रॉनिक काटयावर केले जाते म्हणजे गावातून येणाऱ्या कापसाची नोंद न ठेवता इलेक्ट्रॉनिक काटयावरील झालेल्या वजनाची नोंद ग्राहय धरली जाईल. म्हणजेच जास्तीचा कापुस जो होईल तो गटाचाच राहीलं. इथेच शेतकऱ्याचा प्रति क्विंटल २०० रुपयानी तोटा कमी झाला व स्वाभाविकत: तो शेतकऱ्यांचा फायदाच आहे.
- ✓ जिनींगमध्ये कापुस आल्यानंतर त्याचा ढीग मारला जातो म्हणजेच शेतकऱ्याच्या घरातुन कापुस भरला की तो कापुस गटाचा होतो व त्याचा एकत्रित विमा कंपनीमार्फत विमा काढला जातो. जेणेकरुन काही विपरीत घडल्यास त्याची रक्कम विमा कंपनीकडुन परत मिळते.
- ✓ कापुस जिनींगमध्ये आल्यापासुन त्याची निगराणी ठेवणेही महत्वाचे आहे. त्यासाठी कृषिसमृध्दीच्या वतीने निवडण्यात आलेला गाव विकास समितीचा सचिव व गावातीलच शेतकरी आळीपाळीने निगराणी ठेवतील.
- ✓ सर्व प्रोसेस केल्यानंतर यामध्ये नक्कीचं शेतकऱ्याना रु. १५० ते २०० ज्यादाचा भाव मिळेल व वजनामध्ये दलाला/व्यापाऱ्यामार्फत फसवणुक केलेला कापुस रु. २०० प्रतिक्विंटल असे किमान रु. ३५० ते ४०० चा फायदा क्विंटलमागे नक्कीचं होऊ शकतो. ही सर्व चर्चा केल्यानंतर शेतकऱ्यांना एक अट घालण्यात आली की कापुस एकत्रित करताना कोणत्याही शेतकऱ्यांने कापसावर पाणी मारायचे नाही, जास्त वजन येण्याकरीता दगड, धोंडे, वीट टाकायची नाही व अजित १५५ सोडुन यामध्ये दुसऱ्या जातीचा कापुस मिक्स करायचा नाही.
- ✓ गलई दरम्यान जे काही तुट होईल ही सर्व शेतकऱ्यांकरीता प्रति क्विंटलसाठी सारखी राहीलं. वरील सर्व मुददे शेतकऱ्यांना सांगितल्यानंतर सात गावातील शेतकरी त्यामध्ये असदपुर, रासेगाव चौसाळा, काकडा, चाचोंडी, येलकी पुर्णा, येवता इ. गावातील ५४ शेतकरी पुढे आले. या सर्व प्रक्रियेसाठी कापुस देण्यात आला. सात गावांचा मिळुन ४३८ क्विंटल कापुस लक्ष्मी जिनींग व प्रेसींग युनिट परतवाडा येथे एकत्रित करण्यात आला. कारण जर रुई विकायची असेल तर एक लॉट म्हणजेच १०० गाठी दयाव्या लागतात व त्यासाठी किमान ४५० ते ५०० क्विंटल कापुस लागतो. कापुस एकत्रित करताना रोज कोणत्या न कोणत्यातरी गावातील शेतकरी तसेच कृषिसमृध्दी प्रकल्प व रामकी फाऊंडेशनचे कर्मचारी जिनींग प्रेसींगला मुक्कामास असायचे. नंतर त्याची गलई करण्यात आली व ४३८ क्विंटल कापसापासुन १०२ बेल्स तयार झाल्या त्याचे वजन १६५९५ किलो एवढे आले. बेल्स तयार केल्यानंतर सात गावातील सात शेतकरी कृषिसमृध्दी प्रकल्पाचे कृषि व्यवसाय तज्ज्ञ व रामकी फाऊंडेशनचे कर्मचारी यांनी सॅम्पल घेऊन टेस्टींग करीता फिनले मिल व रेमण्डस, यवतमाळ येथे देण्यात आले व दोन्ही ठिकाणी सॅम्पल पास झाले.

रुईपासुन वेगळी करण्यात आलेल्या सरकीचा लिलाव ठेवण्यात आला व त्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी मिळून अचलपूर व अंजनगाव तालुक्यामध्ये सुरु असलेल्या ऑईल मिलच्या व्यापाऱ्यांना बोलवून घेतले. हया लिलावाकरीता १७ ऑईल मिल व्यापारी उपस्थित राहीले व सरकी लिलावामध्ये रु. १८२१ प्रति क्विंटलने विकली गेली व त्याच दिवशीचा इतर ठिकाणी बाजारभाव रु. १७५० प्रति क्विंटल इतका होता म्हणजे शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रु. ७१ ज्यादा भाव मिळाला कारण गलई करण्यासाठी वापरला गेलेला कापूस एकाच जातीचा होता त्यामुळे सरकीची क्वॉलिटी चांगली होती. तसेच शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन अमरावती येथे सरकीमध्ये तेलाचे प्रमाण किती येईल याची तपासणी केली व तपासणी दरम्यान १४.७५

किलो प्रति क्विंटल सरकीमागे तेलाचे प्रमाण मिळाले. रुई फिनले मिलला विक्री करीता वॅट नंबर, टॅन नंबरची आवश्यकता होती परंतु हे शेतकरी गट नवीन होते व यांनी याबाबतची कोणतीही प्रक्रिया केलेली नव्हती म्हणुन अमरावती येथील मे. दिपक उद्योग यांच्या सहकार्याने शेतकऱ्यांनी लुईस ड्रेफुस कमोडीटीस या कंपनीला निर्यात करण्यात आला. यामध्ये त्यांनी प्रति कँडी (३५६.६२ किलो प्रति कँडी, २ बेल्स म्हणजेच एक कँडी) रु. ४०५००/- इतका भाव दिला. ज्या दिवशी रुई विकली त्यादिवशीचे रुईचे वजन १६३९१ कि.ग्रॅम. आले. कारण बेल्स उन्हामध्ये असल्याने त्याचे वजन सुमारे २०४ किलो घटले. याठिकाणी रुईचा उतारा सरासरी ३७.४२ किलो प्रति क्विंटल कपाशीमागे मिळाला जे की, विदर्भामध्ये सरासरी ३३.५ ते ३४ कि. इतकाचं मिळतो व सरकीचा उतारा ६०.६६ कि. प्रति क्विंटल कपाशीमागे मिळाला. म्हणजेच एकुण ९८.०८ इतक्या किलोचा उतारा रुई व सरकीचा एकत्रित करुन मिळाला व तूट फक्त १.९२ कि. ची झाली. जे की जिनींग व प्रेसींग मिलच्या मालकाशी चौकशी केली असता त्यांनी सांगितले की त्यांना तुट ३ ते ३.५ किलोची मिळते. ज्यादिवशी बेल्स विकल्या त्या दिवशी कापसाचा भाव रु. ५००० प्रति क्विंटल एवढा होता व ही सर्व प्रक्रिया केल्यानंतर शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रु. ५३८७ इतका भाव मिळाला. या सर्व प्रक्रियेकरीता रु. ३१० खर्च आला. यामध्ये ५० टक्के खर्च शेतकऱ्यांनी दिला व ५० टक्के खर्च कृषिसमृध्दी प्रकल्पांतर्गत करण्यात आला.

पुढे जाऊन हेच शेतकरी गट तयार करुन त्याचे नोंदणी प्रक्रिया पुर्ण करुन वॅट नंबर व टीन नंबर काढण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी प्रक्रिया केल्यानंतर कोणत्याही मध्यस्था मार्फत न विकता डायरेक्ट फिनले मिल सारख्या इतर कंपन्यांना विकण्याच्या संधी उपलब्ध होऊ शकतील अशी अपेक्षा आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांनी कापसाच्या बेल्स बनवुन विकल्यामुळे त्यांचा कापुस पणन प्रक्रियेमध्ये सहभाग वाढुन त्यांना अतिरिक्त उत्पन्न प्राप्त झाले.

**संपर्क :**
**कृषिसमृध्दी : समन्वयीत कृषि विकास प्रकल्प,**
**प्रकल्प व्यवस्थापन कक्ष,**
**सहकार संकुल, पहिला मजला, कांता नगर, अमरावती.**
**फोन नंबर - ०७२१-२५५२४७५**

***